नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे | Year - 3rd | अंक - ५८ | Issue - 58 | वार मंगळवार दि. १५ जुलै २०२५ | Blow- Tuesday Date 15 Jully 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## शिवसेना पक्षाचं नाव आणि चिन्हावर ऑगस्टमध्ये निकाल?

### सुप्रिम कोर्टात सुनावणी सुरुच; राजकीय वर्तुळात चर्चा




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : शिवसेना पक्षाचं नाव आणि चिन्हाच्या याचिकेवर सध्या सुप्रीम कोर्टात सुनावणी सुरु आहे. या प्रकरणी सुप्रीम कोर्टात आज देखील सुनावणी पार पडली. विशेष म्हणजे आता या प्रकरणाची सुनावणी आता थेट ऑगस्ट महिन्यात होणार आहे. त्यामुळे ऑगस्ट महिन्यात या प्रकरणावर निकाल येऊ शकतो, अशी राजकीय वर्तुळात चर्चा आहे. या प्रकरणात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने निकाल लागत नाही तोपर्यंत धनुष्यबाण चिन्ह गोठवण्याची मागणी सुप्रीम कोर्टात केली असल्याचीदेखील चर्चा आहे. अर्थात याबाबत काय काय घडामोडी घडतात ते आगामी काळात स्पष्ट होईलच. दरम्यान, सुप्रीम कोर्टाच्या संभाव्य निकालावर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी आज प्रतिक्रिया दिली. ते विधान भवन परिसरात पत्रकारांशी बोलत होते.

सुप्रीम कोर्ट ऑगस्टमध्ये निकाल देणार असतील तर नक्कीच समाधानकारक गोष्ट आहे. सर्वोच्च न्यायालय हे आमची एक शेवटची आशा आहे, जिथे या चोरी प्रकरणाचा न्याय निवाडा होईल. आमचं चिन्ह चोरलं गेलं आहे. निवडणूक आयोगाला चिन्ह देण्याचा अधिकार आहे. मात्र पक्षाचं नाव बदलण्याचा अधिकार नाही. तो निवडणूक आयोगाचा अधिकार नक्कीच नाही. कुणाचं नाव उचलून दुसऱ्याला द्यायचं हा निवडणूक आयोगाला अधिकार नाहीच. तो असूच शकत नाही. तो आम्ही मान्य करत नाही. एखाद्या पक्षाचं नाव उचलून ते दुसऱ्या कुणाला द्यायचं हे निवडणूक आयुक्ताचं कार्यक्षेत्र नाही. निवडणूक निशाणी ठीक आहे. पण नाव आम्ही त्यांचा अधिकार मानतच नाही, असं स्पष्ट मत उद्धव ठाकरे यांनी मांडलं.

उद्धव ठाकरे यांनी इंडिया आघाडीची एक संयुक्त बैठक व्हावी, असं उद्धव ठाकरे यांनी आज विधान भवनात पत्रकारांशी अनौपचारिक गप्पांवेळी सांगितलं. याचबाबत उद्धव ठाकरे यांना कॅमेऱ्यासमोर प्रश्न विचारण्यात आला त्यावर त्यांनी थोडक्यात प्रतिक्रिया दिली. लोकसभा निवडणुकीनंतर इंडिया आघाडीची बैठक झालेली नाही. त्यामुळे इडिया आघाडीची बैठक व्हायला हवी. बिहार निवडणूक जवळ आलेली आहे. तसेच इतर निवडणुका आहेत. महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आहेत. त्यामुळे बैठक व्हावी, अशी आशा उद्धव ठाकरे यांनी व्यक्त केली. तसेच कुठलीही निवडणूक असूद्या. बॅलेटपेपरवरच निवडणूक व्हायला हवी, अशीदेखील भूमिका उद्धव ठाकरे यांनी यावेळी मांडली. मनसे नेते बाळा नांदगावकर यांनी नुकतंच एक वक्तव्य केलं. आम्ही आतापर्यंत स्वतंत्र निवडणूक लढत आलो आहोत. त्यामुळे आगामी काळातही महापालिका निवडणुका स्वतंत्र लढवू शकतो, असं वक्तव्य बाळा नांदगावकर यांनी केलं. पण मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांचा काही दिवसांपूर्वी मेळावा पार पडला. आगामी काळात ते एकत्र येणार असल्याची चर्चा आहे. पण बाळा नांदगावकर यांनी स्वतंत्र निवडणूक लढण्याबाबतचं वक्तव्य केलं. याबाबत उद्धव ठाकरे यांना प्रश्न विचारला असता, मनसेच्या पक्षाने आदेश दिला आहे की, त्या विषयावर कोणत्या प्रवक्त्याने बोलू नये. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जाहीर तर होऊ द्या, अशी प्रतिक्रिया उद्धव ठाकरे यांनी दिली.

## मी अजूनही राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा प्रदेशाध्यक्ष : जयंत पाटील



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्याबाबत सध्या विविध चर्चांना उधाण आलं आहे. जयंत पाटील यांनी प्रदेशाध्यक्ष पदाचा राजीनामा दिल्याची चर्चा दोन दिवसांपासून सुरु आहे. अर्थात खासदार सुप्रिया सुळे यांनी या वृत्ताचं खंडन केलं आहे. तसेच या चर्चांनंतर जयंत पाटील हे भाजपात प्रवेश करणार असल्याच्या चर्चांनादेखील जोरदार उधाण आलं. याबाबत उलटसुलट चर्चांना उधाण आल्यानंतर अखेर जयंत पाटील हे माध्यमांसमोर आले. त्यांनी आपल्याबाबत सुरु असलेल्या विविध चर्चांवर स्पष्टीकरण दिलं आहे. आपण प्रदेशाध्यक्ष पदाचा राजीनामा दिलेला नाही. तसेच आपण राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष असून भाजपात प्रवेश करणार असल्याचं वृत्त खोटं आहे, असं जयंत पाटील यांनी स्पष्ट केलं.

**अखेर जयंत पाटील यांच्याकडून सर्वात मोठा खुलासा**

भाजप पक्षात प्रवेश करण्यासाठी कुणी मला विचारलेलं नाही आणि मी कुणाला तशी विनंती केलेली नाही. एखादा प्रदेशाध्यक्ष असणारा माणूस, त्याच्याबाबत एवढ्या वावड्या उठणे, तो कोणत्या पक्षात जात आहे, याबाबत तुम्हीच सगळे ठरवायला लागले. मला आश्चर्य वाटतं. मला आताच सहाय्यकाने बातमी पाठवली की, बातम्या चालू आहे. मलाही आश्चर्य वाटतंय. सूत्र कुठे आहेत मला दाखवा जरा. मला त्या सूत्रालाच भेटायचं आहे. असं कधी असतं का?, असं जयंत पाटील म्हणाले. कुणी कुणाशी बोललं तरी त्याची बातमी होते. एखाद्या साध्या गोष्टीसाठी कुणी कुणाला भेटलं तरी आपण पराचा कावळा करतो. त्यामुळे अशी कोणतीही परिस्थिती नाही. मी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा प्रदेशाध्यक्ष आहे. मी त्या पक्षाचं काम करतो. शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली काम करणारे आम्ही कार्यकर्ते आहोत. अशा सारख्या बातम्या येत असतात. त्या हळूहळू विरुन जातात. त्यामुळे प्रत्येक वेळी मी नाही, असं कशाला सांगायचं, असं जयंत पाटील म्हणाले. ज्या वृत्तवाहिन्या अशा बातम्या देतात त्या माझं चांगल्या बातम्याही देतात. त्यांचे आणि माझे चांगले संबंध आहेत. त्यामुळे त्यांना नोटीस पाठवून उगाच कटुता निर्माण करणं योग्य नाही. अशा बातम्यांमुळे बदनामी होते पण त्याबरोबर प्रसिद्धी सुद्धा मिळते. हा दुसराही भाग आहे. नाहीतर लोकं विधानसभेचे १० सदस्य असणाऱ्यांच्या अध्यक्षाला एवढं महत्त्वं देत असतील तर त्या प्रसारमाध्यमांचेदेखील आभार मानले पाहिजेत, असं जयंत पाटील उपरोधिकपणे म्हणाले. भाजपने माझ्याशी थेट संपर्क साधलेला नाही. भाजपमध्ये जे अनेक प्रमुख नेते आहेत त्यांच्याशी माझे चांगले संबंध आहेत. मी व्यक्तीगत वैर कुणाशी करत नाही. त्यामुळे भाजपच्या नेत्याशी बोललं, मुख्यमंत्र्यांना भेटलो की त्या पक्षात जाणार अशी चर्चा होते, अशी प्रतिक्रिया जयंत पाटील यांनी दिली.

## युतीचा निर्णय नोव्हेंबर, डिसेंबरपर्यंत घेऊ : राज ठाकरे



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नाशिक: राज ठाकरेंनी उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेसोबतच्या युतीबद्दलचा निर्णय नोव्हेंबर, डिसेंबरपर्यंत घेऊ, असं स्पष्टपणे सांगितले. त्याआधी आज विधिमंडळाच्या आवारात पत्रकारांशी संवाद साधताना उद्धव ठाकरे यांनीदेखील युतीच्या प्रश्नावर अशाच स्वरुपाचं उत्तर दिलं. आधी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लागू देत. मग युतीचं बघू, असं उद्धव ठाकरे म्हणाले आहेत.

ठाकरे बंधूंच्या विजयी मेळाव्याला आठवडा होऊन गेला आहे. गेल्या दोन ते अडीच महिन्यांपासून शिवसेना उबाठा आणि मनसेच्या युतीच्या चर्चा सुरु आहेत. प्राथमिक शाळेतील हिंदी सक्तीवरुन राज ठाकरे आणि उद्धव ठाकरेंनी आक्रमक भूमिका घेतली. त्यामुळे सरकारला याबद्दलचा जीआर निर्णय रद्द करावा लागला. त्यानंतर दोन्ही ठाकरेंनी ५ जुलैला मुंबईत विजयी मेळावा घेतला. यानंतर राज ठाकरेंनी त्यांच्या नेत्यांना युतीसंदर्भात काहीही बोलण्यास मनाई केली. त्यानंतर आता राज ठाकरे नाशिकमध्ये पत्रकारांशी यासंदर्भात बोलले आहेत. अनौपचारिक गप्पा मारताना त्यांनी युतीबद्दलची भूमिका स्पष्ट केली. मुंबईच्या वरळीत ५ जुलैला झालेल्या विजयी मेळाव्याचा राजकारणाशी संबंध नाही. तो मेळावा केवळ मराठीच्या मुद्द्यावर होता, असं राज ठाकरे पत्रकारांसोबत अनौपचारिक गप्पा मारताना म्हणाले. नोव्हेंबर, डिसेंबरपर्यंत युतीचा निर्णय घेऊ, असं म्हणत त्यांनी युतीचा सस्पेन्स वाढवला. नोव्हेंबर, डिसेंबरपर्यंत परिस्थिती पाहू आणि त्यानंतर निर्णय घेऊ, असं राज ठाकरेंनी पत्रकारांना सांगितलं. मनसेच्या तीन दिवसीय शिबिरासाठी राज ठाकरे सध्या इगतपुरीत आहे. या शिबिराचा आजचा पहिला दिवस आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्त्वातील महायुती सरकारनं काढलेल्या हिंदी सक्तीच्या जीआरबद्दलदेखील राज ठाकरे सविस्तर बोलले. त्यावेळी त्यांनी उद्धव ठाकरेंचाही उल्लेख केला. हिंदी सक्तीचा अहवाल ठाकरे यांच्याच सरकारनं स्वीकारल्याची टीका भाजप, शिंदेसेनेकडून करण्यात येते. त्यावर बोलताना राज यांनी सगळ्या गोष्टी मुद्देसूद मांडल्या. त्यातून त्यांनी एकप्रकारे त्यांचे चुलतबंधू उद्धव ठाकरे यांची बाजू ठामपणे मांडल्याचं दिसलं. 'मुख्यमंत्री फडणवीस यांच्या नेतृत्त्वाखालील सरकारनं हिंदी सक्तीचा शासन निर्णय काढला. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना त्यांनी केवळ केंद्र सरकारच्या समितीचा अहवाल स्वीकारला होता. त्या अहवालाची अंमलबजावणी ठाकरेंच्या नेतृत्त्वातील सरकारनं केलेली नव्हती,' अशा शब्दांत राज ठाकरेंनी जीआरची क्रोनोलॉजी सांगितली.

## समृद्धी महामार्गावरुन १२१ किलो गांजाची तस्करी; तिघांना अटक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नाशिक : महाराष्ट्राच्या समृद्धीची भाग्यरेषा म्हणत नागपूर ते मुंबई समृद्धी महामार्गाचे मोठ्या धडाक्यात लोकार्पण करण्यात आले. आता, संपूर्ण महामार्ग प्रवाशांसाठी खुला करण्यात आला आहे. मात्र, हा महामार्ग गेल्या अनेक महिन्यांपासून अपघाताच्या घटनांनी चर्चेत आहे. सातत्याने या महामार्गावर होणारे अपघात चिंतेची आणि संसोधनाची बाब बनला आहे. त्यातच, आता समृद्धी महामार्गाने नागपूरकडून मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या दोन चार चाकी वाहनांमध्ये गांजाचा मोठा साठा आढळून आल्याने खळबळ उडाली आहे. नाशिक पोलिसांनी ही दोन वाहने जप्त केली असून त्यातून तब्बल १२१ किलो गांजा जप्त केला आहे.

**द्योगक व औद्योगिक आस्थापनांची बैठक**

**कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाचे मंत्री मंगलप्रभात लोढा यांचे प्रतिपादन**

## आधुनिक कौशल्यांच्या प्रशिक्षणाद्वारे युवकांना रोजगारक्षम करण्यासाठी उद्योगांनी पुढे यावे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : उद्योग आणि राज्य शासन मिळून मोठ्या संख्येने युवकांना कौशल्य प्रशिक्षण देऊन रोजगारक्षम करणे शक्य आहे. त्यासाठी उद्योगांनाही मोठ्या प्रमाणात प्रशिक्षित मनुष्यबळाची आवश्यकता असतानाच तसेच एक सामाजिक जबाबदारी म्हणून युवकांना कौशल्य पुरविण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन राज्याचे कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाचे मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी केले.

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड ग्रीकल्चर (एमसीसीआयए) येथे व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण विभागाच्यावतीने आयोजित उद्योगक व औद्योगिक आस्थापनांच्या बैठकीत ते बोलत होते. यावेळी एमसीसीआयएचे अध्यक्ष संजय किर्लोस्कर, महासंचालक प्रशांत गिरबने, माजी अध्यक्ष मुकेश मल्होत्रा, प्रदीप भार्गवा, दीपक करंदीकर आदी उपस्थित होते.

टप्प्या-टप्प्याने सर्व आयटीआयचे आधुनिकीकरण व अद्ययावतीकरण

कौशल्य विकास विभागासाठी जागतिक बँकेकडून १ हजार २०० कोटी रुपये मिळाले असून मित्रा संस्थेच्या प्रयत्नातून आशियाई विकास बँकेकडून ४ हजार २०० कोटी रुपये मिळणार आहेत. यातून दरवर्षी १०० आयटीआयचे आधुनिकीकरण व अद्ययावतीकरण करण्यासह सर्वांगीण विकास करण्यात येणार आहे. कालसुसंगत नवीन अभ्यासक्रम सुरू करण्यासह नवीन युगाला आवश्यक तंत्रज्ञानाचे ज्ञान देण्यात येणार आहे.

आयटीआयसाठी 'सार्वजनिक खासगी भागिदारी' धोरण राबविणार

कौशल्य विकास मंत्री श्री. लोढा यांनी पुढे माहिती दिली, औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचा विकास तसेच अभ्यासक्रम निर्मिती, त्यांचे संचालन आदींसाठी सार्वजनिक खासगी भागिदारी अर्थात 'पीपीपी' धोरण राबविण्यात येणार आहे.






त्यासाठी राज्य शासनाचा अधिक प्रमाणात निधी पुरविण्यात येणार असून लवकरच त्याबाबतचे निधीचे प्रमाण निश्चित करण्यात येईल. शासकीय आयटीआय चालविण्यासाठी इच्छुक उद्योग, औद्योगिक संघटनांवर या संस्थाची जबाबदारी काही वर्षासाठी देण्यात येणार असून संबंधितांना या संस्थेत आपल्या गरजेप्रमाणे अभ्यासक्रम तयार करुन राबविता येतील. उद्योजकांना अद्ययावत कौशल्य प्रशिक्षित मनुष्यबळ मिळण्यासह येथील विद्यार्थ्यांना रोजगार मिळावा हा यामागील उद्देश आहे, असेही ते म्हणाले.

यावर्षी राज्यातील आयटीआयमध्ये रोबोटिक्स, कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात एआय, थ्रीडी प्रिंटिंग, इलेक्ट्रिक व्हेईकलसाठी ईव्ही टेक्निशियन, सोलर टेक्निशियन, ड्रोन तंत्रज्ञान हे ६ 'न्यू एज कोर्सेस' तयार करण्यात आले असून असून प्रत्येक आयटीआयमध्ये किमान एक ते दोन अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहेत. नवकल्पनांना चालना देण्यासाठी प्रत्येक आयटीआयमध्ये इन्युबेशन सेंटर सुरू करण्यात येणार आहे, अशी माहितीदेखील त्यांनी दिली.

आयटीआयचा कशा पद्धतीने विकास करावयाचा, कोणते नवीन अभ्यासक्रम सुरू करावयाचे आदी धोरणात्मक बाबी सुचविणे तसेच अंमलबजावणीत महत्त्वाचा सहभाग यासाठी संस्था व्यवस्थापन समितीत एमसीसीआयएने नामांकन केलेल्या सदस्याचा समावेश करण्यात येईल.

प्रधानमंत्री विश्वकर्मा योजनेत समाविष्ट युवकांना कौशल्यांचे प्रशिक्षण देण्याबाबतही प्रयत्न सुरू आहे. कोणताही आयटीआयचा अभ्यासक्रम केलेल्या युवकांना नाविण्यताद्वारे नवोपक्रम घडावेत व त्यातून नवोद्योजक घडावेत यासाठी सुरूवातीला ५ लाख युवकांची ऑनलाईनरित्या परीक्षा घेऊन त्यातून पुढे १ लाख युवकांची व त्यांना प्रशिक्षण देऊन त्यांच्यातून २५ हजार विद्यार्थ्यांनी अंतिम निवड करण्यात येईल. या विद्यार्थ्यांना औद्योगिक प्रशिक्षण संस्थातून त्या क्षेत्रातील अद्ययावत प्रशिक्षण देऊन उत्कृष्ट स्टार्टअप उभे करण्याच्या दृष्टीने प्रशिक्षित करण्यात येईल. या विद्यार्थ्यांना बँकांद्वारे कर्ज पुरविल्यानंतर त्याचे व्याज राज्य शासन देईल. तसेच त्याच्या मुद्दलीची परतफेड संबंधित नवउद्योजकांना २ वर्षानंतर सुरू करता येईल.

श्री. किर्लोस्कर म्हणाले, एमसीसीआयएने राज्य शासनाच्या सहकार्याने विविध क्लस्टर्स स्थापन केले आहे. त्या माध्यमातून नवोद्योजकांना उद्योग सुरू करण्यासाठी मदत करण्यात येते. केंद्र शासन आणि महाराष्ट्र शासन युवकांना नवीन कौशल्यांचे अद्ययावत ज्ञान देण्यासाठी प्रयत्न करीत असून शासन आणि उद्योगांची भागीदारी उद्योगांच्या वृद्धीसाठी आणि युवकांना रोजगार मिळण्यासाठी उपयुक्त ठरेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

विभागाचे व्यवसाय प्रशिक्षण सहसंचालक चंद्रशेखर ढेकणे यांनी प्रास्ताविक केले.

यावेळी मंत्री श्री. लोढा यांनी उपस्थित उद्योजक, उद्योग संघटनांचे प्रतिनिधी आदींकडून राज्य शासनाच्या आगामी धोरणाच्या अनुषंगाने व भविष्यातील उपक्रमाच्या अनुषंगाने विविध सूचना जाणून घेतल्या. त्यावर सकारात्मक कार्यवाही करण्यात येईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

## संपादकीय....

### युतीची घाई

ठाकरे बंधूंच्या विजयी मेळाव्याला आठवडा होऊन गेला आहे. गेल्या दोन ते अडीच महिन्यांपासून शिवसेना उबाठा आणि मनसेच्या युतीच्या चर्चा सुरु आहेत. प्राथमिक शाळेतील हिंदी सक्तीवरुन राज ठाकरे आणि उद्धव ठाकरेंनी आक्रमक भूमिका घेतली. त्यामुळे सरकारला याबद्दलचा जीआर निर्णय रद्द करावा लागला. त्यानंतर दोन्ही ठाकरेंनी ५ जुलैला मुंबईत विजयी मेळावा घेतला. यानंतर राज ठाकरेंनी त्यांच्या नेत्यांना युतीसंदर्भात काहीही बोलण्यास मनाई केली. त्यानंतर आता राज ठाकरे नाशिकमध्ये पत्रकारांशी यासंदर्भात बोलले आहेत. अनौपचारिक गप्पा मारताना त्यांनी युतीबद्दलची भूमिका स्पष्ट केली. मुंबईच्या वरळीत ५ जुलैला झालेल्या विजयी मेळाव्याचा राजकारणाशी संबंध नाही. तो मेळावा केवळ मराठीच्या मुद्द्यावर होता, असं राज ठाकरे पत्रकारांसोबत अनौपचारिक गप्पा मारताना म्हणाले. नोव्हेंबर, डिसेंबरपर्यंत युतीचा निर्णय घेऊ, असं म्हणत त्यांनी युतीचा सस्पेन्स वाढवला. नोव्हेंबर, डिसेंबरपर्यंत परिस्थिती पाहू आणि त्यानंतर निर्णय घेऊ, असं राज ठाकरेंनी पत्रकारांना सांगितलं. मनसेच्या तीन दिवसीय शिबिरासाठी राज ठाकरे सध्या इगतपुरीत आहे. या शिबिराचा आजचा पहिला दिवस आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्त्वातील महायुती सरकारनं काढलेल्या हिंदी सक्तीच्या जीआरबद्दलदेखील राज ठाकरे सविस्तर बोलले. त्यावेळी त्यांनी उद्धव ठाकरेंचाही उल्लेख केला. हिंदी सक्तीचा अहवाल ठाकरे यांच्याच सरकारनं स्वीकारल्याची टीका भाजप, शिंदेसेनेकडून करण्यात येते. त्यावर बोलताना राज यांनी सगळ्या गोष्टी मुद्देसूद मांडल्या. त्यातून त्यांनी एकप्रकारे त्यांचे चुलतबंधू उद्धव ठाकरे यांची बाजू ठामपणे मांडल्याचं दिसलं.

# निसर्गाच्या कुशीत चार मैत्रिणींची कामशेत सफर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

जीवनाच्या धावपळीत कधी स्वतःसाठी वेळ मिळतो का? घर, काम, जबाबदाऱ्या आणि नित्यनेमाच्या यंत्रवत जगण्यातून बाहेर पडून, एक दिवस स्वतःसाठी जगायला आम्ही चार मैत्रिणी ठरवलं...

स्नेहा दिपक खामकर, सरिता साळुंखे, प्रियांका चव्हाण आणि बकुल इंदुलकर – आम्ही चौघी मैत्रिणी ठरवलं की, एक दिवस स्वतःच्या आनंदासाठी, मैत्रीच्या नात्याला उजाळा देण्यासाठी कामशेत या निसर्गरम्य ठिकाणी एक छोटीशी सहल करायची!

**सुरुवात झाली एका रस्त्यावरच्या प्रवासाने...**

सकाळीच गाडीत बसलो. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर हास्य, मनात उत्सुकता आणि गाडीत संगीताचा ताल! सनरूफ उघडून निळ्या आकाशाचा, झाडीतून झिरपत येणाऱ्या प्रकाशाचा आणि हवेतल्या गारव्याचा आनंद घेत आमचा प्रवास सुरु झाला.

प्रत्येक वळणावर निसर्गाचं वेगळं रूप सामोरं येत होतं. कधी दाट जंगलं, कधी डोंगर उतार, कधी छोट्या झऱ्यांचा खळखळाट आणि या प्रत्येक दृश्याला साक्षी ठेवत आमचा उत्साह अधिकच वाढत गेला.

**कुंडेश्वर मंदिर आणि निसर्गसौंदर्याचा अमृतरस**

कामशेत जवळील कुंडेश्वर मंदिर हे आमचं पहिले गंतव्य. डोंगरांच्या कुशीत वसलेलं हे शांत आणि पावन ठिकाण – एकदम मनाला भिडणारं. बाजूलाच वाहणारा झरा, हिरवीगार झाडं, आणि डोंगरावरून खाली कोसळणारा पाण्याचा लहानसा धबधबा – इथलं प्रत्येक क्षण मनात साठवून ठेवावा असा!

भटकंतीतील खास भाग – मस्त नाश्ता स्वतः तयार करून!

आमचं वेगळेपण इथे दिसून आलं – आम्ही केवळ सहलीला गेलो नव्हतो, तर अनुभवासाठी निघालो होतो! एक छोटी गॅस शेगडी, थोडं साहित्य, आणि मनात फक्त उत्साह – इतकंच घेतलं होतं. मग काय, त्या डोंगरकाठावर, अंधाऱ्या ढगांच्या सावलीत आम्ही गरमागरम उपमा, पोहे आणि चहा तयार केला.



मोकळ्या आकाशाखाली, थेट निसर्गाच्या सान्निध्यात स्वतः केलेला नाश्ता खाण्याचा तो अनुभव शब्दात सांगता येणारा नाही. तो एक क्षण 'स्वतःच्या' साठी होता.

फोटोशूट, हशा आणि निसर्गातली नाती...

सहलीचा दुसरा अविभाज्य भाग म्हणजे आठवणी टिपणं!

धबधब्याच्या पार्श्वभूमीवर, डोंगराच्या सान्निध्यात, आणि एका दुसऱ्याच्या हास्यात – आम्ही आठवणी गोळा करत होतो. कोणीतरी फोटोग्राफर बनायचं, कोणीतरी हसवायचं, आणि कोणीतरी सगळ्यांचा स्टाईल कोरंग सांभाळायचा!

ही केवळ फोटो काढण्याची प्रक्रिया नव्हती, ती मैत्रीची उत्स्फूर्तता होती.

क्षण... जे शब्दात नाही पण मनात घर करून राहतात त्या एका दिवसात आम्ही मोबाईल, कामाचे तणाव, घरच्या जबाबदाऱ्या – सगळं मागे टाकून फक्त 'जगण्याचा' अनुभव घेतला. एकमेकींच्या सोबतीत, निसर्गाच्या कुशीत, साध्या गोष्टींमध्येही किती आनंद असतो हे पुन्हा जाणवलं.

शेवट, पण नवीन सुरुवातीची आठवण....

कामशेतची ही सहल आम्हाला इतकी आवडली की ती फक्त एक दिवसाची नाही राहिली – ती आमच्या आयुष्यातली एक अविस्मरणीय आठवण बनून गेली. आता ही चौघी मैत्रिणी, नव्या सहलीसाठी नक्कीच पुन्हा एकत्र येतील, कारण मैत्रीच्या आठवणी अशा सहलींनीच जपल्या जातात!

निसर्गातला क्षण, मैत्रीतला रंग – कामशेतची भटकंती, हृदयातली एक खास जागा!

**एक आवाहन – अशा छोट्या सहली करा**

ही भटकंती आम्हाला शिकवून गेली की, आयुष्यातला आनंद मोठ्या गोष्टींमध्ये नसतोच. तो अशा छोट्या, साध्या पण सच्च्या क्षणांमध्ये असतो. वेळ मिळालाच तर असा एक दिवस निसर्गाच्या सान्निध्यात घालवा. कुठेही फारसे पैसे खर्च न करता, फारशी तयारी न करता सुद्धा आनंद मिळवता येतो – हे आम्हाला कळलं.

**लेखिका – स्नेहा दिपक खामकर, पुणे**

# गुरुपौर्णिमेनिमित्त डॉ. विश्वासराव आरोटे यांच्याकडून हृदयस्पर्शी शुभेच्छा संदेश – गुरुंची शिकवणच जीवनाची शिदोरी!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अकोले/प्रतिनिधी :गुरु ही संकल्पना केवळ अध्यापनापुरती मर्यादित नसून, ती संपूर्ण जीवन घडविणारी असते. आपल्या आयुष्यात ज्यांनी ज्ञान, संस्कार, मूल्य, विचार व दिशा दिली, अशा सर्व गुरूंना वंदन करण्याचा हा दिवस म्हणजे गुरुपौर्णिमा. या पावन पर्वानिमित्त महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस आणि ज्येष्ठ संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांनी एक हृदयस्पर्शी, अर्थवाही आणि प्रेरणादायी शुभेच्छा संदेश दिला आहे.

डॉ. आरोटे यांनी आपल्या शुभेच्छा संदेशात सांगितले, या जन्मावर, या जगण्यावर शतदा प्रेम करावे कारण या आयुष्यात जो काही मी आहे, ते माझ्या गुरुजनांमुळेच. आई–वडील हे जीवनाचे पहिले गुरु असतात. त्यानंतर शिक्षण, समाजकारण, पत्रकारिता यामध्ये विविध टप्प्यांवर अनेक गुरूंनी माझं मन, विचार, मूल्य आणि आत्मविश्वास घडवला.

ते पुढे म्हणतात, गुरु म्हणजे केवळ ज्ञान देणारा शिक्षक नव्हे, तर प्रत्येक अडचणीत, संधीच्या क्षणी, वळणावर, संकटात, आणि विचारांच्या संघर्षात जो दिशा दाखवतो तो खरा गुरु असतो. त्यांनी फक्त शिकवलेच नाही, तर 'तूच आहेस तुझ्या जीवनाचा शिल्पकार' हेही आत्मविश्वासाने सांगितले. अशा सर्व गुरूंना माझे नम्र वंदन!

डॉ. विश्वासराव आरोटे यांनी गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने एक वैचारिक हाक दिली आहे! आजच्या या दिवसावरून आपण सर्वांनी निश्चय करायला हवा की, सत्ता, संपत्ती किंवा प्रसिद्धीपेक्षा आपल्या आयुष्यात सोन्यासारखी माणसे जपायला हवीत. कारण जीवनात कधी नातेसंबंध, कधी माणुसकी, तर कधी एकच सल्ला – आपल्याला अंधारातून बाहेर काढतो. अशा गुरूंनी दिलेली शिकवण हीच शिदोरी आहे.




ते पुढे नमूद करतात, ज्ञान, विवेक, संयम, व्यवहार, आत्मविश्वास, धैर्य, त्याग, निष्ठा आणि माणुसकी – ही सर्व जीवनमूल्ये मला गुरुजनांनी दिलेली देणगी आहे. ती पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवण्याचे व्रत मी घेतले आहे.

गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुः गुरुर्देवो महेश्वरः।
गुरुः साक्षात् परब्रह्म तस्मै श्री गुरवे नमः।।

या मंत्राच्या उच्चाराने डॉ. विश्वासराव आरोटे यांनी सर्व गुरुजनांच्या चरणी कृतज्ञता व्यक्त केली आहे.

गुरुपौर्णिमेच्या सर्वांना मनःपूर्वक शुभेच्छा!

गुरुचरणी वंदन, जीवनात प्रकाश मिळो हीच प्रार्थना!

# नवीन वीज उपकेंद्रामुळे श्रीरामपूरमधील उद्योगवाढीस चालना : पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

शिर्डी, – श्रीरामपूर तालुक्याला भेडसावणाऱ्या अपुऱ्या वीजपुरवठ्याच्या समस्येचे निराकरण २२०/३३ केव्ही क्षमतेच्या उच्चदाब वीज उपकेंद्रामुळे होणार असून, शेती व एमआयडीसीमधील उद्योगांना पूर्ण क्षमतेने वीजपुरवठा होईल व तालुक्यातील नवीन उद्योगांना चालना मिळेल, असे प्रतिपादन राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.



श्रीरामपूर एमआयडीसीमध्ये ५९ कोटी ६२ लाख रुपये खर्चून उभारण्यात येणाऱ्या या उपकेंद्राचे भूमिपूजन पालकमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.याप्रसंगी कार्यक्रमाला आमदार हेमंत ओगले, महापारेषणचे मुख्य अभियंता संजीव भोळे, अधीक्षक अभियंता श्रीकृष्ण नवलाखे, अशोक मडावी, हादी खान, जिल्हा बँकेचे संचालक करण ससाणे, नितीन दिनकर, दीपक पठारे, नानासाहेब शिंदे, सचिन गुजर आदी मान्यवर उपस्थित होते.

पालकमंत्री विखे पाटील म्हणाले, महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी ट्रान्समिशन कंपनीच्या या प्रकल्पामुळे श्रीरामपूर औद्योगिक वसाहत, एमआयडीसी परिसर, बेलापूर, भोकर, नायगाव, हरेगाव, सुतगिरणी, शिरसगाव, उक्कलगाव, मातापूर आणि सन फ्रेश कंपनीसह परिसरातील वीजदाबाची समस्या कायमची दूर होईल. आजवर या भागात कमी दाबामुळे अनेक उद्योग अडचणीत होते. सुमारे ६० कोटी रुपये खर्चाच्या या प्रकल्पाची कामे महाट्रान्सकोकडून एक वर्षात पूर्ण करण्यात येतील.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तातडीने निधी उपलब्ध करून दिल्याने हे उपकेंद्र साकार होत आहे. राज्य विजेच्या बाबतीत आत्मनिर्भरतेकडे वाटचाल करत आहे. ६५ हजार मेगावॅट क्षमतेचे पंप स्टोरेज हायड्रो प्रकल्प आणि ३.२५ लाख कोटींच्या गुंतवणुकीतून हे काम सुरू आहे. जुन्या प्रकल्पांचेही नूतनीकरण होत असून, सौर ऊर्जेच्या माध्यमातून राज्यातील ४० टक्के कृषी फिडर सौरऊर्जेवर आणण्याचा संकल्प आहे. त्यामुळे वीज दरात १० ते २६ टक्क्यांची घसरण होईल. नेट मीटरिंगमुळे घरगुती ग्राहकांनाही लाभ होत आहे. ७.५ हॉर्सपॉवरपर्यंत मोफत वीज देण्याचे धोरण कायम असून, राज्य विजेसंदर्भात स्वयंपूर्ण होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे दुष्काळमुक्त महाराष्ट्राचे स्वप्न प्रत्यक्षात उतरण्यासाठी १ लाख कोटींच्या जलसंधारण योजनांवर काम सुरू आहे. गोदावरी–जायकवाडी प्रकल्प, पाण्याचे पुनर्वहन, भंडारदऱ्यातील अतिरिक्त पाणी आणि खोऱ्यांमधील योजना राबवल्या जात आहेत. भाषणं व मोर्चे न काढता प्रत्यक्ष कामं होत आहेत, हेच शासनाचे खरे कार्य आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

आमदार हेमंत ओगले म्हणाले , सध्या श्रीरामपूर तालुक्याला बाभळेश्वर व नेवासा तालुक्यातून वीजपुरवठा होत असल्यामुळे अनेक ठिकाणी ट्रान्सफॉर्मर ओव्हरलोड होत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागतो. नव्या उपकेंद्रामुळे या समस्या दूर होतील आणि एमआयडीसीमध्ये नवे उद्योगधंदे सुरू होऊन रोजगारनिर्मितीला चालना मिळेल.

या उपकेंद्राची प्रशासकीय मान्यता डॉ संजीव कुमार(भा.प्र.से.) अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक महाट्रांसको (महापारेषण)यांनी त्वरीत दिली तसेच या उपकेंद्राचे कार्यादेश अविनाश निंबाळकर संचालक ( प्रकल्प) यांच्या कडून त्वरीत देण्यास आले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्य अभियंता संजीव भोळे यांनी केले.

# बिहारमध्ये ८०.११ टक्के मतदारांनी भरले नावनोंदणी फॉर्म

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : भारत निवडणूक आयोगाने बिहारमधील जवळपास सर्व मतदारांशी थेट संपर्क प्रस्थापित केला असून, आज सायंकाळी ६ वाजेपर्यंत एकूण ६ कोटी ३२ लाख ५९ हजार ४९७ म्हणजेच ८०.११% मतदारांनी नावनोंदणी फॉर्म भरून सादर केले आहेत. ही लक्षवेधी कामगिरी वेळेआधीच साध्य झाली आहे.

ईसीआयनेट या नव्याने विकसित करण्यात आलेल्या सॉफ्टवेअरमध्ये सर्व ४० जुने ॲप्स समाविष्ट करण्यात आले आहेत आणि यामध्ये आतापर्यंत ४.६६ कोटी फॉर्म डिजिटल स्वरूपात अपलोड करण्यात आले आहेत.

राज्यात ७७,८९५ बूथस्तर अधिकारी कार्यरत आहेत आणि त्यांच्यासोबत २०,६०३ नव्याने नियुक्त इडजी कार्यान्वित आहेत. एकूण ३८ जिल्हा निवडणूक अधिकारी , २४३ विधानसभा मतदारसंघांतील मतदार नोंदणी अधिकारी आणि ९६३ सहाय्यक एठजी या कामावर लक्ष ठेऊन आहेत.

## सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत खरात व परिवाराची मदत

## चिमुकल्यांच्या चेहऱ्यावर फुलले हास्य

# सामाजिक बांधिलकी जोपासत विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : देऊळ गाव राजा शहरातील सामाजिक क्षेत्रात काम करणारे अन्यायाला वाचा फोडणारे भ्रष्ट अधिकारी व कर्मचाऱ्यांचा कर्दनकाळ ठरलेले राज्य शासनाकडून अशासकीय सदस्य म्हणून नियुक्त झालेले चंद्रकांत खरात यांनी आपणाला व आपल्या परिवाराला या समाजाचे काहीतरी देणे लागते ही भावना मनात ठेवून शिक्षणाचे जरी व्यासपीठ उपलब्ध असले तरी आर्थिक परिस्थिती जेमतेम असलेल्या विद्यार्थ्यांना दिनांक ११ जुलै २५ रोजी श्री छत्रपती शिवाजी महाराज हायस्कूल मधील व इतर शाळेतील गरजवंत विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप केले त्यांनी राबविलेल्या या उपक्रमाचे सर्वच स्तरातून कौतुक होत आहे यासाठी त्यांना श्री व्यंकटेश कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ. मधुकर जाधव यांनी व जानराव गायकवाड यांनी भरीव मदत केली. याबाबत सविस्तर असे की शहरासह जिल्ह्यात समाजपयोगी कामे व अन्यायाला वाचा फोडण्यासाठी सदैव प्रयत्नशील असणारे चंद्रकांत खरात यांनी या नगर परिषद चे कर्तव्यदक्ष मुख्याधिकारी अरुण मोकळ यांचे वाढदिवसाचे औचित्य साधून गरजवंत शालेय विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटपाचा निर्णय घेतला व प्रत्यक्ष त्यांचे सहकारी प्रा. मधुकर जाधव यांना सोबत घेऊन शाळेला भेटी देऊन प्रत्येक वर्गात जाऊन ज्या विद्यार्थ्यांची आर्थिक परिस्थिती जेमतेम आहे त्यांची शिक्षण घेण्याची खूप इच्छा आहे मात्र घरच्या हलाखीच्या परिस्थितीमुळे अपेक्षित असे शालेय साहित्य घेण्यामध्ये असमर्थ आहेत अशा विद्यार्थ्यांची निवड करून जवळपास ३८० गरजवंत विद्यार्थ्यांना



स्कूल बॅग रजिस्टर पेन पेन्सिल व परीक्षेचे पॅड व इतर शालेय साहित्याचे वाटप केले यावेळी उपविभागीय अधिकारी प्राध्यापक संजय खडसे उपविभागीय पोलीस अधिकारी मनीषा कदम, मुख्याधिकारी अरुण मोकळ शाळेचे मुख्याध्यापक संजय देशमुख, प्रभारी पोलीस निरीक्षक आशिष रोही, नायब तहसीलदार सायली जाधव, एपीआय हेमंत शिंदे, संतोष जोगदंडे आगर प्रमुख चिखली, पंचायत समितीचे सहायक अभियंता अमोल इंगळे,कर निरीक्षक न.प गणेश मुळे, वैद्यकीय अधिकारी डॉ ज्योत्स्ना गवई सामाजिक कार्यकर्ते शाम गुजर, गजानन तिडके, , सन्मती जैन, मुशिर कोटकर, सौ पंचशीला खरात, संध्या सूर्यकांत खरात, बेबी चंद्रकांत खरात, कार्यक्रमाचे मुख्य संयोजक चंद्रकांत खरात, प्राध्यापक मधुकर जाधव, मंगेश तिडके जानराव गायकवाड सचिन सुनगत सह या शाळेचे शिक्षक वृंद कर्मचारी शहरातील पत्रकार बांधव सामाजिक क्षेत्रात काम करणारे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते तर ज्या ज्या विद्यार्थी , विद्यार्थिनींना हे शालेय साहित्य मिळाले त्या चिमुकल्यांच्या चेहऱ्यावरील आनंद पाहण्यासारखा होता. प्रास्तविक प्रा. मधूकर जाधव तर संचालन राजेश खोडचौरे व आभार विजय तायडे सर यांनी मानले.

# जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद एका आठवड्यासाठी अभ्यागतांना दुपारी ४ ते सायं. ६ या वेळेत भेटणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका) : जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद हे दिनांक १४ जुलै ते १८ जुलै २०२५ या एकाच आठवड्यासाठी दररोज दुपारी ४ ते सायंकाळी ६ या वेळेत जिल्हाधिकारी कार्यालय येथे अभ्यागतांना भेटणार आहेत. तरी जिल्ह्यातील नागरिकांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात येत आहे.



आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद हे पंढरपूर येथील नियोजनात व्यस्त असल्याने प्रत्येक आठवड्याच्या सोमवार व शुक्रवार रोजीच्या अभ्यागतांच्या भेटी रद्द करण्यात आलेल्या होत्या. तरी दिनांक १४ ते १८ जुलै या कालावधीत दररोज ते नागरिकांना भेटणार आहेत.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई–मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे–३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# विविध मागण्यासाठी पडघा टोल नाका बंद आंदोलन

## चर्चेला टोल कंपनीचे जबाबदार अधिकारी हजर न राहिल्याने नागरिकांचा संताप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : पडघा टोल नाका विरोधात विविध संघटना गेली तेरा वर्षे संघर्ष करत असलेल्या विविध कामांच्या मागण्यांसाठी भिवंडी, शहापूर ,कल्याण तालुक्यातील सर्व शिवसेना (ठाकरे गट) महाराष्ट्र नवनिर्माण सेना इतर सामाजिक संघटनांच्या वतीने भव्य मोर्चाचे आयोजन येत्या १७ जुलै २०२५ रोजी सकाळी १० वाजल्या पासून पडघा प्रवेशद्वार येथून ते पडघा टोल नाका पर्यंत आंदोलन छेडण्यात येणार आहे. तर नागरिकांनी मोठ्या संख्येने मोर्चामध्ये सहभागी होऊन सामाजिक बांधिलकी जपावी असे आवाहन करण्यात आले आहे.

पडघा टोल नाका रस्ता व त्या लगत असलेल्या सर्व्हिस रस्त्यांची तात्काळ दुरुस्ती करणे, परिसरातील शेरेकरपाडा, डोहोळे, कोशिंबी, बोरिवली, भादाणे सर्व्हिस रोड बनवणे व रोडची दुरुस्ती करणे. भादाणे अंडर पास मध्ये पाणी साचत आहे व त्यामधील रस्ता हा पुर्णपणे खड्डेमय झाला आहे त्याची दुरुस्ती करणे, शेरेकरपाडा येथे अंडर पास बनवणे.

तळवली अंडर पासचा टेंडर दोन वर्षापुर्वी निघाला असून सदरील काम लवकरात लवकर करणे. पडघा कल्याण रस्त्यावरील सापे, तळवली, वाशेरे, आमणे, सावद रस्त्यावर खुप खड्डे पडले आहेत. त्यामुळे सदर रस्त्यावर खुप अपघात होत आहे. त्याची लवकरात लवकर दुरुस्ती व्हावी.

अशा मागण्यासाठी पडघा टोल नाका बंद आंदोलन व मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. महामार्गावर प्रलंबित असलेल्या कामांसंदर्भात टोलनाका प्रशासनाशी संपर्क साधला असता त्यांनी याविषयी कोणत्याही प्रकारची प्रतिक्रिया देण्यास नकार दिला आहे. जोपर्यंत आमच्या मागण्या पूर्ण होत नाही ,तोपर्यंत पडघा टोल नाका बंदच राहील, कितीही पोलीस, प्रशासनाचा दबाव आला तरी हा मोर्चा निघणारच, असे यावेळी शिवसेना ( ठाकरे गट) उपजिल्हाप्रमुख प्रकाश भोईर यांनी बोलतांना सांगितले. आम्ही गेले पंधरा वर्षे विविध मागण्यांसाठी भांडत असतो परंतु लॉजिस्टिक कंपनी समोर अंडरपास आला कुठून या मागे काहीतरी गुपित दडलंय अस मला वाटते असे यावेळी सामाजिक कार्यकर्ते भगवान सांबरे यांनी बोलताना सांगितले. अनेक लोकांचे मृत्यू झाले आंदोलनी झाली म्हणून हा सरळ भाषा समजत नाही आपण सर्वांनी एकत्र येऊन प्रशासनाला जाब विचारूया, आणि प्रवाशांचा जीव वाचवूया असे यावेळी मनसेचे जिल्हाध्यक्ष शैलेश बिडवी यांनी बोलताना सांगितले. पडघा हा लॉजेस्टिक हब आहे. इथे लाखो नागरिक नोकरीसाठी येतात. परतू प्रवास करताना जीव मुठीत घेऊन प्रवास करावं लागतो. म्हणून हा आंदोलन सक्रिय करण्यासाठी सर्वांनी यात सहभागी व्हा. असे अँड संदीप जाधव यांनी बोलतांना सांगितले. खड्ड्यांमुळे अजून अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही म्हणून सर्वांनी एकत्र या असे रघुनाथ पाटील यांनी बोलतांना सांगितले. यावेळी पडघा येथे झालेल्या पत्रकार परिषदेत शिवसेना ( ठाकरे गट) उपजिल्हाप्रमुख प्रकाश भोईर , मनसेचे जिल्हाध्यक्ष शैलेश बिडवी , सामाजिक कार्यकर्ते भगवान सांबरे,काशिनाथ शेलार, रघुनाथ पाटील, अँड संदीप जाधव उपस्थित होते.



नियोजित मोर्चा संदर्भात तोडगा काढण्यासाठी स्थानिक सर्व पक्षीय पदाधिकारी, पोलीस प्रशासन, टोल प्रशासन यांची बैठक पडघा येथे आयोजित केली होती, परंतु बैठकीला टोल महामार्ग प्राधिकरणाचे प्रकल्प अधिकारी ढगे हे उपस्थित राहणार होते मात्र ऐनवली प्रकल्प अधिकाऱ्यांनी बैठकीला दांडी मारून अन्य एका अधिकाऱ्याला बैठकीला पाठवले होते. यामुळे सर्वांनी संताप व्यक्त केला. यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी राहुल झाल्टे यांनी मध्यस्ती करून येत्या मंगळवारी पुन्हा बैठकीचे नियोजन करून अधिकाऱ्यांना बोलावून घेऊ असे आश्वासन दिले आहे.

परंतु मोर्चा हा लोकशाही मार्गाने निघणारच ह्यावर सर्वजन ठाम आहेत. असे मत यावेळी शिवसेना (ठाकरे गट) , मनसेच्या कार्यकर्त्यांनी बोलतांना सांगितले. यावेळी ठाणे ग्रामीण गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलीस निरीक्षक सुरेश मनोरे, उपविभागीय पोलीस अधिकारी राहुल झाल्टे, पडघा पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक जितेंद्र ठाकूर तर पडघा परिसरातील विविध पक्षाचे, संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

# चांदवड विद्युत कर्मचारी पतसंस्थेची ४९ वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीचे वातावरणात संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : विद्युत कर्मचारी सहकारी पत संस्था मर्यादित चांदवडची ४९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच सेलिब्रेशन मंगल कार्यालय चांदवड या ठिकाणी संस्थेचे चेअरमन प्रवीण सोनवणे यांचे अध्यक्षतेखाली खेळीमेळीत संपन्न झाली.



संस्थेची सभासद संख्या ८४६ असून वसूली भाग भांडवल १०५२४१५४ /-मुदत ठेव ८२९११७०१/-आहेत, सभासद यांना ३१/०३/२०२५ अखेर कर्ज वाटप १८५७५८१७४ /- केले आहे खेळते भाग भांडवल२८३८८६२३६./- आहे संस्थेने सभासद यांचा अपघाती विमा रु २५ लाख काढलेला आहे संस्थेला सण २०२४/२०२५. या आर्थिक वर्षात४९५८६६१/- इतका नफा झालेला आहे सभासद यांच्या पाल्यांना लग्न निमित्त शुभमंगल विवाह भेट देण्यात येते व पहिली ते पदवीधर विद्यार्थ्यांना दरवर्षी शालेय बक्षीस योजना राबवली जाते सभासद यांना २०२३/२०२४ च्या भाग भांडवलावर ९% लाभांश वाटप करण्यात येणार आहे संस्थेचे सल्लागार संचालक पंडित पगार यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे. याप्रसंगी धनवटे, अरुण म्हस्के, जी एच वाघ, पंडित कुमावत, सतीश पाटील, दीपक गांगुर्डे, महेश कदम, खान, बळीराम शिंदे, शिवाजी सुरवाडे, कांतीलाल सोनवणे, उत्तम झाल्टे, विलास वडघुले, हीरामन पवार, राजू खालकर, प्रवीण आहेर, महेश पगारे, आदी उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व अहवाल वाचन संस्थेचे सचिव सुभाष निफाडे यांनी केले असून आभार संस्थेचे व्हा. चेअरमन सचिन अहिरे यांनी केले.

# शिवस्वराज्य युवा प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य प्रदेशाध्यक्षपदी प्रिती विचारे यांची निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : कोथरूड पुणे येथिल सामाजिक कार्यकर्त्या सौ.प्रिती प्रकाश विचारे यांची शिवस्वराज्य युवा प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य संघटनेच्या प्रदेशाध्यक्ष महाराष्ट्र राज्य महिला आघाडी प्रमुख पदी सर्वानुमते निवड करण्यात आली.या निवडीचे नियुक्तीपत्र शिवस्वराज्य युवा प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य संघटनेचे संस्थापक अध्यक्ष पोपट पताडे यांच्या हस्ते देण्यात आले व या नियुक्तीबाबत संस्थेचे



संस्थापक अध्यक्ष पोपट आत्माराम पताडे यांनी सौ. विचारे यांच्या कार्याची दखल घेऊन ही निवड करण्यात आली आहे.

या निवडीबद्दल प्रदेशाध्यक्ष - मधुकर मुरलीधर भोर, प्रदेश संघटक - विक्रम कदम, प्रदेश उपाध्यक्षा - श्रीमती विमलताई काजळे आदिंनी अभिनंदन करुन पुढिल वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

या नियुक्तीमुळे महाराष्ट्रातील सर्व तालुका व जिल्हा पदाधिकारी यांच्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, सर्व स्तरातून .प्रिती प्रकाश विचारे यांचे अभिनंदन होत आहे. भविष्यात त्यांच्या मार्गदर्शनातून नव्या पिढीला प्रेरणा मिळेल, असा विश्वास नागरिक व सहकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.



# शिरोळ येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

शहापूर/विजय घनघाव : आज दिवंगत अमृता सुकाजी घनघाव गुरुजी यांच्या २४ व्या स्मृतिदिनानिमित घनघाव एज्युकेशन ट्रस्टच्या वतीने शिरोळ येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी शिरोळ ग्रामपंचायतीच्या सदस्या सौ. भारती शांताराम पवार, माजी उपसरपंच श्री. सिराज शेख, राष्ट्रवादीचे युवा नेते श्री मच्छिंद्र निकाले, आम्रपाली महिला बचत गटाच्या अध्यक्षा सौ.अनिता पवार, स्थानिक रहिवासी श्री. जयवंत वाघचौडे, घनघाव एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष श्री राजेश घनघाव, विश्वस्त श्री.सुनिल घनघाव, आदर्श घनघाव तसेच जिल्हा परिषद शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. रेखा जंगम, सहशिक्षिका सौ कविता भोये यांच्या हस्ते शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी दिवंगत घनघाव गुरुजी यांच्या स्मृतीस अभिवादन करण्यात आले.

# म्हाळसाकोरे सह भुसे शिवारात दरोडा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड तालुक्यातील म्हाळसाकोरे भुसे शिवारात पाच ते सहा दरोडेखोरांनी दरोडा टाकण्याचा प्रयत्न केला. काही ठिकाणी दरोडा टाकण्यात यशस्वी झाले तर काही ठिकाणी वस्तीवरील नागरिक जागे झाल्याने अनर्थ टळला. तर एका ठिकाणी दरोडेखोरांनी एका नागरिकास मारहाण केली. शिवाजी वाळके यांच्या वस्तीवर प्रथम आले त्यांनी तेथे विठ्ठल वाळके यांना मारहाण करून त्यांना जखमी केले त्यानंतर त्यांनी घरातील महिलांकडे मोर्चा वळवला परंतु विठ्ठल ने आवाज देऊन दरवाज्याची कडी उघडू नका. असं सांगितल्यावर मुलांनी दरवाजा लावून धरला त्यामुळे गागाट झाला व तिथून



पळ काढून त्यांनी अर्जुन एकनाथ वाळके यांच्या वस्तीवर बल्ब काढून घराच्या बाहेर कड्या लावून दरवाजा उघडण्याचा प्रयत्न केला तेथूनही माणसं जागे झाल्यावर पळ काढला त्यानंतर भहिरु भुसारे यांच्या वस्तीवर जाऊन दरवाजाला धक्के दिले. तेथे माणसं जागी झाली त्यानंतर त्यांनी मोर्चा राजू दत्तू आबा मुरकुटे यांच्या वस्तीकडे जाऊन दरवाजा तोडून मध्ये घुसले त्यानंतर त्यांनी राजूला मारहाण करून एका कोपऱ्याला बसवले व सर्व महिलांचे पोथी कानातले सोन काढून घेतले व पैसे मागण्यासाठी सुरुवात केली त्यानंतर राजू च पोरग रडायला लागलं त्या आवाजामुळे शेजारील रघुनाथ पांडुरंग मुरकुटे जागी झाले हे बघितल्यानंतर चोरानी तिथून पळ काढला त्यानंतर ते नागरे वस्तीवर येऊन त्यांनी माधव नागरे यांच्या दरवाज्याला धक्के दिले व त्यानंतर सर्व घरांच्या बाहेरून कड्या लावून गणेश सोमनाथ नागरे यांची गाडी पळून छगन नागरे यांच्या घराच्या पाठीमागे लावून पळ काढला. हे चोर पाच ते सहा जण होते त्यांनी चेहऱ्यावरचे फक्त डोळे उघडे ठेवले होते. व ते मराठी व हिंदी भाषेचा वापर करत होते. असं प्रत्यक्षदर्शी राजू दत्तू आबा मुरकुटे व विठ्ठल वाळके यांच्या सांगण्यावरून कळाले.

सदर घटनेची माहिती मिळताच सायखेडा सहाय्यक पोलिस निरीक्षक विकास ढोकरे व कर्मचाऱ्यांसह घटनास्थळी धाव घेतली. अधिक तपास सायखेडा पोलीस करत आहे

**वैनतेय विद्यामंदिरात गोरख सानप यांचा अभिनव उपक्रम**

**विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रभक्तीचा संस्कार**

# निफाड वैनतेय विद्यालयात चिमुकल्यांनी घडवली वाढदिवसातून राष्ट्रभक्ती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड, ता. १४: शाळा म्हटलं की बालकांवर चांगले संस्कार व्हावे या उद्देशाने विविध राष्ट्रपुरूष, संत, समाजसुधारक, शास्त्रज्ञ व क्रातिकारकांची जयंती-पुण्यतिथी साजरी केली जाते. या सर्व राष्ट्रपुरूषांच्या प्रतिमा शाळेत उपलब्ध असतीलच असे नाही. या नेत्यांच्या प्रतिमा उपलब्ध करून घेण्यासाठी निफाड येथील वैनतेय प्राथमिक विद्यामंदिरातील शिक्षक गोरख सानप यांनी अनोखा उपक्रम राबविला.



पालक मुलांच्या वाढदिवसानिमित्त केक, चॉकलेट, फरसाण, सजावट साहित्य अशा विविध बाबींवर अवास्तव खर्च करतात. या खर्चाला फाटा देत वाढदिवसाच्या दिवशी मुलाने एका राष्ट्रपुरूषाची प्रतिमा शाळेला भेट म्हणून द्यावी असे आवाहन सानप यांनी पालकांना केले. विद्यार्थ्यांना व पालकांनाही ते पटलं आणि पाहता-पाहता शाळेत राष्ट्रपुरूष, संत, शास्त्रज्ञ, समाजसुधारक यांच्या प्रतिमा जमा होऊ लागल्या.


शाळेत परिपाठाच्या वेळी मुलांचे वाढदिवस साजरे करून त्यांनी दिलेल्या प्रतिमेतील राष्ट्रपुरूषांच्या जीवनकार्याची माहिती सांगितली जाते. संस्थेचे अध्यक्ष वि.दा. व्यवहारे यांनी उपक्रमात सहभागी पालकांचे आभार मानले.

लोकसहभागातून शाळेचा विकास करून विद्यार्थ्यांमधे राष्ट्रभक्तीचा संस्कार रूजविणाऱ्या या उपक्रमाचे न्या. रानडे विद्याप्रसारक मंडळ निफाड संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष वि. दा. व्यवहारे, सचिव रतन वडघुले, संस्थापक विश्वस्त अ‍ॅड ल.जि. उगांवकर, विश्वस्त किरण कापसे, राजेंद्र राठी, राजेश सोनी, अ‍ॅड. दिलीप वाघावकर, विश्वास कराड, मधुकर राऊत, प्रभाकर कुयटे, नरेंद्र नांदे, निफाड पंचायत समितीचे प्रभारी गटशिक्षणाधिकारी प्रशांत गायकवाड, विस्तार अधिकारी लता भरसट, केंद्रप्रमुख अनिता आहिरे व पालकांनी कौतुक केले. उपक्रमाच्या यशस्वितेसाठी गोरख सानप, किरण खेरनार, संजय जाधव, कल्पना पेठे व शिक्षकांनी परिश्रम घेतले.

**वाढदिवसाला होणारा अनावश्यक खर्च टाळून पालकांच्या सहकार्यातून मुलांमध्ये राष्ट्रभक्तीची जोपासना करण्यासाठी शिक्षकाने राबविलेला उपक्रम खरोखरच प्रेरणादायी आहे.**
**- वि. दा. व्यवहारे, अध्यक्ष न्या. रानडे विद्याप्रसारक मंडळ, निफाड**

# गुंजरगा येथे पावसासाठी महादेवाला तेरणेच्या पाण्याचे जलअभिषेक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



लातूर प्रतिनिधी/अमर जाधव : निलंगा तालुक्यातील गुंजरगा येथे शेतकरी बांधवांच्या वतिने गुंजरगा गावातील ग्रामदैवत महादेव मदिरात पाउस पडावा यासाठी जलअभिषेक करण्यात आला ,गुंजरगा गावातील ग्रामस्थ व शैतकर्यांच जिवनमान हे शैतीवर अवलंबुन असल्याने गेल्या एक महिण्यापासुन पावसाचा खंड पडल्याने पीक पावसावाचुन वाळत असल्याने पाउस पडावा यासाठी गावातील शेतकरी व ग्रामस्थांनी तेरणा नदीचे पाणी डोक्यावर आनुन गावातील महादेवाला जलअभिषक करत महादेव पिड पाण्यात ठेवत पावसासाठी साकडे घातले.

यावेळी सरपंच मनोज भास्कर शिंदे, धनराज मुळे, मोहन पाटील, छत्रुघन शिंदे, बालाजी धुमाळ, लक्ष्मन शिंदे, गुणवंत शिंदे, माधव धुमाळ, विठ्ठल शिंदे,व्यंकट पाटील, माधव भोसले, भिम धुमाळ, कोमलबाई धुमाळ, आशा कुमठे, वंदाबाई धुमाळ, अनिता धुमाळ, सनमुख रदाळे, मनोज शिंदे, परमेश्वर शिंदे, काशिनाथ शिंदे, संग्राम सुर्यवंशी ञ्यंबक शिंदे, गोपाळ फलाटे, वसंत फलाटे वैजनाथ शिंदे शिवाजी शिंदे, सह महादाम गुंजरगा ग्रामस्थ उपस्थित होते.

# श्री विठ्ठल रूक्मिणीमातेची बुधवारी प्रक्षाळपुजा

## प्रक्षाळपुजेनिमित्त श्रींच्या दर्शन वेळेत बदल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : दरवर्षी आषाढी यात्रेला भाविकांची होणारी गर्दी लक्षात घेता, यात्रा कालावधीत चांगला महुर्त व दिवस पाहून श्रींचा पलंग काढून भाविकांना जास्तीतजास्त वेळ दर्शन उपलब्ध करून देण्यात येते. दिनांक २७ जून रोजी श्रींचा पलंग काढल्याने काकडा आरती, पोशाख, धुपारती, शेजारती इ. राजोपचार बंद होऊन नित्यपुजा, महानैवेद्य व गंधादक्षा हे राजोपचार सुरू होते. सदरचे राजोपचार पूर्ववत करण्यासाठी चांगला महुर्त व दिवस पाहून दिनांक १६ जुलै रोजी श्रींची



विधिवत प्रक्षाळपुजा करण्यात येणार असल्याची माहिती व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली.

प्रक्षाळपुजेनिमित्त दिनांक १६ जुलै रोजी श्रींच्या दर्शन वेळेत बदल होणार असून, पहाटे ५.०० ते दु.१२.२०, दु.१२.३० ते २.१०, दु.५.३० ते ६.४५, रा.७.१० ते ११.३० या वेळेत दर्शन सुरू राहील तसेच दु.१२.२० ते १२.३०, दु.२.१० ते ५.३०, सायं.६.४५ ते ७.१० या वेळेत श्रीस पहिले स्नान, महाअभिषेक, अलंकार, महानैवेद्य व धुपारती निमित्त पदस्पर्शदर्शन बंद राहणार आहे. तथापि, श्रींचे मुखदर्शन नेहमीप्रमाणे सुरू राहील.

श्री. विठ्ठलाकडे ११ ब्रम्हवृदांकडून श्रीस रूद्राचा अभिषेक व श्री.रूक्मिणीमातेस ११ ब्रम्हवृंदाकडून पवमान अभिषेक केला जाणार असून, श्रींची प्रक्षाळपुजा मंदिर समिती सदस्य महोदयांच्या शुभहस्ते होणार आहे.

# सावखेड तेजन ते आडगाव राजा डांबरीकरण बोगस झालेला रस्ता परत करण्याचे आदेश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे /बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी/सिंदखेड : राजा तालुक्यातील सावखेड तेजन ते आडगाव राजा इजिमा १६४ डांबरीकरण रस्त्याचे काम अतिशय निकृष्ट दर्जाची झाले असल्यामुळे अवघे चार महिने सुद्धा न होता ते काम ठीक ठिकाणी खूप मोठ्या प्रमाणात मोठे खड्डे पडले आहे तर ७५ ते १०० मिटर अंतरावर सील कोट ची चुरी निघत असून रस्ता उघडा पडत आहे सदरील कामाची किंमत अंदाजपत्रकाद्वारे



**जिल्हा परिषद उपअभियंता देऊळगाव राजा यांना गजानन कहाळे यांनी केली होती तक्रार**

रक्कम रु, ५०५६७९६ निधीचे काम शासनाने देऊनही काम चांगल्या कॉलिटी चे होऊन जास्त दिवस टीकावे परंतू इथे मात्र संबंधित अधिकाऱ्याने मात्र वरवर थातूर मातुर स्वरूपाचे काम करून लाखो रुपयाचा भ्रष्टाचार करण्याचा प्रयत्न सुरु आहे त्या करिता आडगाव राजा ते सावखेड इजीमा १६४डांबरीकरण या अतिशय बोगस झालेल्या कामाची जिल्हा परिषद बांधकाम उपविभागीय उपअभियंता यांना गजानन कहाळे यांनी तक्रार करून मात्र चौकशी दरम्यान निकृष्ट दर्जाचे जिवंत पुरावे सादर केलें असून मात्र ते काम दुरुस्त करण्याचे कळविले आहे तरी ते काम तात्काळ परत करण्यात यावे तो पर्यंत संबंधिता चे बिल देण्यात यऊ नये दिल्यास आपल्या स्तरावरून आपले




कार्यालय जबाबदार राहील असे न केल्यास गजानन कहाळे उच्च स्तरीय चौकशी करणार असून वरिष्ठाकडे न्याय मागणार आहे.




# उगाव छत्रपती शिवाजी विद्यालयात कायदेविषयक व शासकीय योजनांचे मार्गदर्शन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड तालुक्यातील उगाव महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे छत्रपती शिवाजी हायस्कूल व दिनकरराव पानगव्हाणे कनिष्ठ महाविद्यालयात महिला व बालहक्क कायदे व शासकीय योजना या विषयावर संरक्षण अधिकारी वाघ एम एस, पठाण ए एम, तसेच चाइल्ड हेल्पलाइन चे दीपक शिंदे, सचिन शिराळा यांचे प्रमुख उपस्थितीत विविध विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. यात महिलांवर होणार अन्याय /अत्याचार, शासकीय पातळीवर विविध योजना, बाल विवाह प्रतिबंध, महिला आणि फौजदारी कायदे, बालहक्क कायदा, कौटूंबिक हिंसाचारापासून महिला संरक्षण कायदा या विषयी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. विद्यालयाचे प्राचार्य कैलास गवळी यांच्या हस्ते उपस्थित प्रमुख मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. फलक रेखाटन कलाशिक्षिका श्रीमती रुक्साना पठाण यांनी केले तर सूत्रसंचालन भालचंद्र सूर्यवंशी यांनी केले. आभार श्रीमती शीतल ढोमसे, पाटील यांनी केले.

# इंदापूर तालुक्यातील वनगळी येथे राहणाऱ्या ३६ वर्षीय महिलेची छेडछाड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी/ अतुल सोनकांबळे : इंदापूर तालुक्यातील वनगळी येथे एका ३६ वर्षीय महिलेस गावातील पुरुषाने मनात लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करत विनयभंग केला आहे. सदर विनयभंग करणाऱ्या व्यक्तीच्या विरोधात इंदापूर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. इंदापूर तालुक्यातील वनगळी येथील ३६ वर्षीय महिला दि. ९ जुलै रोजी गुरांना वैरण कापत असताना वनगळी येथील आरोपी विनोद पांडुरंग सोमवंशी याने सदर महिलेचा हात पकडून मनात लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करत विनयभंग केला आहे.




तशा प्रकारची तक्रार सदर महिलेने इंदापूर पोलीस स्टेशनमध्ये नोंदवली आहे. तसेच सदर प्रकार घडल्यानंतर सदर महिलेचा पतीने घडलेल्या प्रकाराबाबत जाब विचारण्यासाठी आरोपी विनोद पांडुरंग सोमवंशी यांच्याकडे गेले असता. आरोपी विनोद पांडुरंग सोमवंशी यांने सदर महिलेच्या पतीला शिवीगाळ व दमदाटी करत हात, पाय तोडीन अशी गंभीर धमकी दिल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

### पंढरपूर उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले यांची बदली

# पंढरपूर उपविभागीय पोलीस अधिकारी म्हणून श्री प्रशांत डंगळे होणार रुजू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले यांची बदली झाली असून नूतन उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या जागी श्री प्रशांत डंगळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील चिमुर तालुक्याचा पदभार पाहत होती. गृह विभागाने बदलीचे आदेश जारी केले आहेत.




त्यामुळे पंढरपूर तालुक्यातील नवीन डिवाइस पी मिळाले आहेत श्री प्रशांत डंगळे यांच्यासमोर तालुक्यातील अवैध धंदे वाळू तस्करी मावा वैद्य गुटखा वाहतूक विक्री रोखण्याची आव्हान यांच्यासमोर असणार आहे त्याचप्रमाणे पंढरपूर शहरातील गँगवार व भुरटी दादागिरी महिला व मुलींची छेडछाड करणारी प्रमाणही रोखण्याचे आव्हान हेही त्यांच्यासमोर आहे.

नवीन येणारे उपविभागीय पोलीस अधिकारी कसा वचक बसवतील याकडे स्थानिक नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# न्यायसहायक प्रयोगशाळा बळकट करण्यासाठी लोकाभिमुख व ब्लॉकचेन पद्धतीचा अवलंब करणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नागपूर : महाराष्ट्रात देशातील सर्वात अत्याधुनिक सायबर न्यायसहायक वैज्ञानिक व्यवस्था निर्माण करण्यात आली आहे. आधुनिक सायबर प्रयोगशाळांसह मोबाईल न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा उभारल्या जात आहेत. तंत्रज्ञान, सायबर आणि फसवणुकीचे वाढते गुन्हे लक्षात घेता येत्या काळात लोकाभिमुख व ब्लॉकचेन पद्धतीचा अवलंब करुन न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळांची व्यवस्था अधिक मजबूत करण्यात येईल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केले.

येथील धंतोली परिसरात प्रादेशिक न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळेच्या नवीन प्रशासकीय इमारतीचे भूमिपूजन आणि गृह विभागाच्या तीन नवीन प्रकल्पांचे ऑनलाईन लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. गृह (ग्रामीण) राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, खासदार श्यामकुमार बर्वे, आमदार संदीप जोशी आणि संजय मेश्राम, महासंचालक (न्यायिक व तांत्रिक) संजय वर्मा, महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळाच्या व्यवस्थापकीय

**महाराष्ट्रात देशातील सर्वोत्तम सायबर न्यायसहायक प्रयोगशाळा; मुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रादेशिक न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळेच्या इमारतीचे भूमिपूजन**

संचालक अर्चना त्यागी आणि न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालयाचे संचालक डॉ. विजय ठाकरे यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, गुन्ह्यांची सिद्धता होऊन गुन्हेगारास शासन व पिडीतांना न्याय मिळवून देण्यासाठी न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळांची भूमिका महत्त्वाची ठरते. नवीन भारतीय फौजदारी कायद्यांनी न्यायसहायक पुराव्यांचे महत्त्व अधोरेखित केले आहे तसेच विवक्षित गुन्ह्यांमध्येही यास अनिवार्यता प्राप्त झाली आहे. राज्यात गुन्हे सिद्धतेचे प्रमाण वाढविण्यासाठी २०१४ नंतर विशेष प्रयत्न झाले असून वैविध्यपूर्ण पद्धतीचा अवलंब, तांत्रिक पुरावे आणि न्यायसहायक वैज्ञानिक पुराव्यांवर भर देण्यात आला व १४ शासन निर्णय काढून गुन्हे सिद्धतेचे प्रमाण ९ वरुन ५४ टक्क्यांवर आणले. विकसित भारताच्या दिशेने मार्गक्रमण करतांना गुन्हे सिद्धतेचे हे प्रमाण ९० टक्क्यांपुढे घेऊन जावे लागेल, असेही त्यांनी सांगितले. राज्यात आधुनिक सायबर न्यायसहायक प्रयोगशाळा, न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा, मोबाईल न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा आणि नवी मुंबई येथे सायबर केंद्र उभारुन त्याचे महामंडळात रुपांतर करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

नागपूर येथील प्रादेशिक न्यायसहायकवैज्ञानिकप्रयोगशाळा ही अत्याधुनिक करण्याच्या दिशेने पावले टाकण्यात आली. या प्रयोगशाळेच्या इमारतीचे




भूमिपूजन ही एक समाधानाची बाब असून फेब्रुवारी २०२७ पर्यंत या इमारतीचे बांधकाम पूर्ण व्हावे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. प्रादेशिक न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळांच्या कामांमध्ये लोकाभिमुखता व ब्लॉकचेन पद्धतीचा अवलंब करण्यात येईल. यामुळे वेळेत गुन्ह्यांची सिद्धता होऊन न्यायदानास गती येईल. न्यायसहायक वैज्ञानिक व्यवस्था हे एक लोकसेवेचे कार्य असून या वर्षाअखेर प्रलंबित असलेले सर्व प्रकरणे निकाली काढण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी केल्या. तत्पूर्वी, गृह विभागांतर्गत नव्याने कार्यान्वित झालेल्या प्रयोगशाळा संगणकीकरणाच्या दुसऱ्या टप्प्याचे, मुंबई येथील सेमी टोमेटेड सिस्टीमचे आणि पुणे येथील सेंटर ऑफ एक्सलन्सचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ऑनलाईन लोकार्पण झाले. न्यायसहायकवैज्ञानिकप्रयोगशाळा संचालनालयाचे संचालक डॉ. विजय ठाकरे यांनी प्रास्ताविक केले तर प्रादेशिक न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा नागपूरचे उपसंचालक अश्विन गेडाम यांनी आभार मानले.

### श्रावस्ती बुद्ध विहारच्या वतीने ऐतिहासिक अजिंठा लेणी येथे धम्म यात्रा सहलीचे यशस्वी आयोजन

# वर्षावासाच्या निमित्ताने बौद्ध संस्कृतीचे जागरण; समाजाला दिला सकारात्मक संदेश




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पिंपळे गुरव, प्रतिनिधी : श्रावस्ती बुद्ध विहार, पिंपळे गुरव यांच्या वतीने वर्षावासाच्या पवित्र निमित्ताने जागतिक वारसा स्थळ असलेल्या अजिंठा लेणी येथे एक दिवसीय धम्म यात्रा सहलीचे आयोजन करण्यात आले. रविवार, दिनांक १३ जुलै रोजी ही सहल अत्यंत शिस्तबद्ध व उत्साहात पार पडली. सहलीत लहानांपासून ज्येष्ठांपर्यंत अनेक भाविकांनी सहभाग घेतला.

या धम्म यात्रेचा मुख्य उद्देश बौद्ध संस्कृतीचा गौरव, इतिहासाचे दर्शन आणि नव्या पिढीत धम्मविषयक जाणिवा जागवणे हा होता. अजिंठा लेणीतील बुद्ध चरित्रावर आधारित भित्तीचित्रे, प्राचीन शिल्पकला आणि बौद्ध स्थापत्यशैली पाहून उपस्थित भाविक भारावून गेले.

यात्रेदरम्यान त्रिशरणपाठ, बुद्धवंदना, सामूहिक ध्यान आणि मार्गदर्शकांच्या सहाय्याने लेण्यांचा ऐतिहासिक व धार्मिक अभ्यासही करण्यात आला. शांत, सात्विक वातावरणात सहलीचा अनुभव अध्यात्मिक उन्नती देणारा ठरला.

या प्रसंगी विहाराचे संस्थापक व अध्यक्ष आयु. कैलास गहिनीनाथ बनसोडे यांनी बौद्ध समाजाला एक महत्त्वाचा संदेश दिला. त्यांनी आपल्या भाषणात सांगितले की –

आजची धम्म यात्रा म्हणजे फक्त एक सहल नसून, ती आत्मपरीक्षणाची आणि धम्माच्या मार्गाने चालण्याची प्रेरणा देणारी होती. नव्या पिढीने बौद्ध धम्माचे विचार, करुणा, मैत्री व समतेचे मूल्य आत्मसात करावे, हीच खरी श्रद्धांजली आहे बुद्धांच्या कार्याला.

> **श्रावस्ती बुद्ध विहारच्या वतीने वर्षावसाच्या निमित्ताने ऐतिहासिक धर्मस्थळ अजिंठा लेणी येथे धम्मयात्रा सहलीचे आयोजन केले अतिशय चैतन्यमय वातावरणात उत्साहात सहल संपन्न झाली यांची मला समाधान आहे समाजामध्ये जनजागृती होणे आवश्यक आहे त्याशिवाय धम्म चळवळीस गती येणार नाही**
>
> **– आयु.कैलास गहिनीनाथ बनसोडे**
> **संस्थापक/अध्यक्ष श्रावस्ती बुद्ध विहार, पिंपळे गुरव**

त्यांच्या या संदेशाने उपस्थितांमध्ये नवीन ऊर्जा, जागरूकता आणि सामाजिक भान निर्माण झाले. समाजाने शिक्षण, नैतिकता आणि समतेच्या मार्गावर चालत एकसंध राहावे, हा त्यांचा आग्रह होता.

सहलीचे आयोजन अत्यंत यशस्वीपणे पार पडले. श्रावस्ती बुद्ध विहारचे कार्यकर्ते, सदस्य व भाविकांनी उत्कृष्ट संयोजन करून या उपक्रमात आपले योगदान दिले. सहभागी नागरिकांनी आयोजकांचे मन:पूर्वक आभार मानले व भविष्यातही अशाच अर्थपूर्ण आणि धम्मप्रधान उपक्रम राबवावेत, अशी अपेक्षा व्यक्त केली.